भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

# खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

## कनिष्ठ विभाग

कला,विज्ञान,वाणिज्य




**माहिती- पुस्तिका**

**सन २०१७-१८**



www.kholeshwarmahavidyalaya.org.in

बालाजी प्रेस, अंबा../९४२१३३६५९४

## आम्हास यांचा सार्थ अभिमान आहे !

प्रा. हेडे एन.एस. यांना दि.२४ डिसेंबर २०१६ रोजी राष्ट्रीय ग्राहकदिनानिमित्त ग्राहकतीर्थ स्व. बिंदू माधव जोशी स्मृती पुरस्कार मा.उपजिल्हाधिकारी श्री चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

प्रा. पवार पी. के. यांना दि. ३१ मार्च २०१७ रोजी स्वा. रा. ती. महाविद्यालय, अंबाजोगाई येथे हिंदी राष्ट्रीय संगोष्ठी संपन्न झाली. ढाडी जनजाती: संस्कृती और लोकगीत या विषयावर शोधनिबंधाचे वाचन केले.

प्रा. डॉ. दिगंबर मुडेगावकर यांना दि. २८ जानेवारी २०१७ रोजी वैद्यनाथ महाविद्यालय, परळी येथे राज्यस्तरीय संस्कृत चर्चा सत्रात 'कवी पुरुषोत्तम बंदेष्टी यांच्या चित्रांची वैशिष्ट्ये : एक अध्ययन' या विषयावर शोध निबंध वाचन केले.

प्रा. चिटणीस के.एम. यांनी दि. १५ जानेवारी २०१७ नांदेड येथे राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत लोकगीताचे गायन केले. या स्पर्धेत त्यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

### गुणवंत विद्यार्थी

कु. साक्षी उद्धवराव कराड इ. ११ वी कला हया विद्यार्थिनीने पेन्टाक्यू स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर यश प्राप्त केले व थायलंड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय पेन्टाक्यू स्पर्धेत तिची निवड झाली आहे.

कु. साहू सायली मुकेश व कु. गव्हाणे कल्पना बालासाहेब इ. १२ वी कला शाखेच्या या विद्यार्थिनींनी राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत यश प्राप्त केले.

दि. २ऑक्टोबर २०१६ रोजी गांधी विचार संस्कार परीक्षा जळगाव फाऊंडेशन आयोजित स्पर्धेत चि. शिंदे महेश, चि. आहेर केशवराज, चि. पठाण वाजेद खाँ, इ. १२वी च्या या तीनही विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तरावर घवघवीत यश प्राप्त केले.

### ११ वीतील गुणवंत विद्यार्थी सन् २०१६-१७

| नाव | शाखा | गुणानुक्रम | टक्केवारी |
|---|---|---|---|
| मगर शिवानी हनुमंत | कला | ५४२ | ८३.३६ % |
| राख प्रतिक्षा सुनिल | कला | ५३७ | ८२.६१ % |
| जगताप निकिता श्रीनिवास | कला | ५२२ | ८०.३० % |
| चव्हाण पुजा मन्मथ | वाणिज्य | ५४५ | ८३.८५ % |
| कटवाल योगिता राम | वाणिज्य | ५३४ | ८२.१५ % |
| तिवारी गायत्री भगवान | वाणिज्य | ४८६ | ७४.७७ % |
| दळवे दिव्या रुस्तुम | विज्ञान | ४९८ | ७६.६१ % |
| गडदे गायत्री हरिश्चंद्र | विज्ञान | ४९२ | ७५.६९ % |
| बनसोडे शांताराणी बालाजी | विज्ञान | ४७६ | ७३.२३ % |

## इ. ११ वी व १२ वी साठीचे प्रवेशाचे नियम खालीलप्रमाणे

इ. ११ वी

अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ व्यतिरिक्त दुसऱ्या मंडळाची शालान्त परीक्षा उत्तीर्ण पण इंग्रजी विषय घेतले नसल्यास अपात्र ठरेल.

ब) इ. ११ वी कोणत्याही शाखेत उत्तीर्ण विद्यार्थी दोन किंवा दोनपेक्षा जास्त खंड असलेला विद्यार्थी अपात्र. (फक्त एक वर्षाचा खंड चालेल.)

क) आय.टी.आय. / शेतकी शाळा नियमित वर्गांना २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेला विद्यार्थी अपात्र.

इ. १२ वी (विज्ञान )
इ. ११ वी कला, वाणिज्य, किमान कौशल्य, उत्तीर्ण विद्यार्थी अपात्र

इ. १२ वी (वाणिज्य)
इ. ११ वी कला, किमान कौशल्य उत्तीर्ण विद्यार्थी अपात्र

इ. १२ वी (कला)
इ. ११ वी किमान कौशल्य उत्तीर्ण विद्यार्थी अपात्र
इ. १२ वी मधील कोणत्याही शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थी अपात्र

इ. १२ वी नापास व दोन किंवा दोन वर्षपेक्षा जास्त खंड असणारे विद्यार्थी अपात्र (फक्त नापास विद्यार्थ्यांचा एका वर्षाचा खंड चालेल.)

दुसऱ्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा टी. सी. च्या पाठीमागे मा. शिक्षणाधिकाऱ्याची स्वाक्षरी आवश्यक आहे.

टी. सी. च्या दुय्यम प्रतीवर प्रवेश देण्यासाठी पोलीसस्टेशनशच्या एफ.आय.आर.ची प्रत व हमी पत्राची प्रत आवश्यक आहे.

बाहेरच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यास प्रवेश देताना त्याची पटपडताळणी झाल्याची मा. प्राचार्याचे पत्र आवश्यक आहे .

अन्य महाविद्यालयातील इ. ११ वी वाणिज्य व विज्ञान शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेशास अपात्र.

प्रवेश फॉर्म भरताना सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक तसेच व्यवस्थित फॉर्म भरलेला पाहूनच स्वाक्षरी करावी.